# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.09.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1) महाराष्ट्रातील 11 हजार 200 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं उद्धाटन.

2) दिव्यांगाना सहानुभूती नव्हे तर प्रोत्साहन देण्याची गरज - केंद्रीय सामाजिक न्याय आणि सशक्तिकरण मंत्री डॉक्टर विरेन्द्र कुमार

3) महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकांसाठी सर्व यंत्रणा सज्ज - मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार

4) जम्मू-काश्मीरमधल्या विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचा प्रचार आज संपणार

आणि

5) जागतिक ॲथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर स्पर्धेत गुलवीर सिंग सुवर्णपदकाचा मानकरी.

**पंतप्रधान-महाराष्ट्र प्रकल्प**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ पद्धतीनं महाराष्ट्रातील 11 हजार 200 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे उद्धाटन करून ते प्रकल्प राष्ट्राला समर्पित करणार आहेत. पुण्यातील जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मेट्रो सेवेचे उद्धाटन मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या मेट्रो प्रकल्पासाठी 1 हजार 8 शे 10 कोटी रुपये खर्च आला आहे. त्याचबरोबर 2 हजार 9 शे 55 कोटी रुपये खर्चून विकसित करण्यात येणाऱ्या पुणे मेट्रो स्वारगेट-कात्रज विस्ताराची पायाभरणीही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमांतर्गत बिडकीन औद्योगिक क्षेत्र; पंतप्रधान देशाला समर्पित करतील. केंद्र सरकारनं 6 हजार 4 शे कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या या प्रकल्पाला मान्यता दिली आहे. तसंच पुण्यातील भिडेवाडा इथल्या सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेच्या स्मारकाचे भूमिपूजनही पंतप्रधान करणार आहेत.

यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते सोलापूर विमानतळाचे उद्घाटनदेखील होणार आहे.  यामुळे सोलापूर शहर देशाच्या विविध शहरांशी जोडलं जाणार असून पर्यटक, व्यावसायिक, प्रवासी आणि गुंतवणूकदारांना याचा मोठा फायदा होणार आहे.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे सकाळी अकरा वाजता देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा 114  वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून आणि दूरदर्शन वाहिनीवरून प्रसारित होईल. Newsonair डॉट gov डॉट in हे संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ऍपवरही हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. या प्रसारणानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमध्ये हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल.

**दिव्यांग मेळावा**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यात दिव्यांगांचं  मोठे योगदान असणार आहे. त्यामुळे दिव्यांगाना सहानुभूती नव्हे तर प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचं प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय आणि सशक्तिकरण मंत्री डॉक्टर विरेन्द्र कुमार यांनी काल पुण्यात केलं. केंद्रीय सामाजिक न्याय विभागाच्यावतीनं व्होकल फॉर लोकल या संकल्पने अंतर्गत सांगवीतील पीडब्ल्यूडी मैदानावर दिव्य कला मेळाव्याचं उद्घाटन वीरेंद्र कुमार यांच्या उपस्थितीत झालं त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्यपाल सी. पी राधाकृष्णन, खासदार श्रीरंग बारणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.दिव्यांग उद्योजकांना मुख्य प्रवाहात येण्यासाठी समाजानं पुढाकार घेतला पाहिजे,असं  राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आपल्या भाषणात म्हणाले.या मेळाव्यात दिव्यांग कलाकार आणि उद्योजक आपल्या वस्तू आणि सेवांसह सहभागी झाले आहेत.

**निवडणूक आयोग**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोगाचं पथक दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहे. या तयारीचा आढावा घेतल्यानंतर या पथकाने काल मुंबईत पत्रकार परिषद घेतली. निष्पक्ष आणि निर्भय वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचं यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितलं. शहरी भागातल्या जवळपास 100 टक्के आणि ग्रामीण भागातल्या 50 टक्के मतदान केंद्रावर web casting ची सुविधा दिली जाणार आहे. जनतेनं उत्साहानं या मतदानाच्या उत्सवात सहभागी व्हावं असं ते म्हणाले.

**इस्रायल**

इस्रायलच्या संरक्षण दलानं केलेल्या हल्ल्यात हिजबुल्लाचा नेता हसन नसराल्लाहच्या मृत्यूनंतर, इस्रायलला लक्ष्य करणाऱ्यांना परिणाम भोगावे लागतील असा इशारा इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराणला दिला आहे. इराण आणि मध्यपूर्वेतील कोणतंही स्थान इस्रायलच्या आवाक्याबाहेर नाही,असं सांगत नेतान्याहू म्हणाले की,इस्रायलनं असंख्य इस्रायली आणि इतर देशांतल्या अनेक नागरिकांच्या हत्येसाठी जबाबदार असलेल्या तसंच इस्रायली ओलीसांना परत करण्याचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हसन नसराल्लाह यांची हत्या महत्त्वाची होती.दरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनीही नसराल्लाहचा मृत्यू त्यांच्या अनेक पीडितांना न्याय मिळवून देणारा उपाय असल्याचं म्हटलं आहे. अनेक दशकांपासून अमेरिकन, इस्रायली आणि लेबनीज नागरिकांच्या हत्येसाठी तो जबाबदार होता असं सांगत जो बायडेन यांनी हिजबुल्लाह, हमास आणि हुथी यांच्याकडून येणाऱ्या धमक्यांपासून इस्रायलच्या स्वसंरक्षणाच्या अधिकाराला पाठिंबा देण्यास अमेरिका वचनबद्ध असल्याचं बायडेन यांनी म्हटलं आहे.

**एस जयशंकर**

पाकिस्तानचं दहशतवादाचं धोरण कधीही यशस्वी होणार नाही आणि या कृतींचे परिणाम त्यानं नक्कीच भोगावे लागतील, असं परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते काल न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र महासंघाच्या 79 व्या अधिवेशनात बोलत होते. पाकिस्ताननं बेकायदेशीरपणे बळकावलेल्या भारतीय भूभागाची सुटका करणं आणि दहशतवादाशी दीर्घकाळापासून असलेली संलग्नता सोडणं या दोनच मुद्यांवर भारत-पाक दरम्यान चर्चा होऊ शकते,असं जयशंकर म्हणाले.

**जम्मू-काश्मीर-निवडणूक**

जम्मू-काश्मीरमधल्या विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचा प्रचार आज संपणार आहे. या शेवटच्या टप्प्यात परवा मंगळवारी 40 विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे.

या 40 जागांपैकी 16 जागा काश्मीर विभागात आहेत, तर 24 जागा जम्मू विभागात आहेत.पहिल्या टप्प्यात 61 टक्क्यांहून अधिक मतदान झालं आहे , तर दुसऱ्या टप्प्यात 56 टक्क्यांहून अधिक मतदान झालं.येत्या 8 ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.

**VIJETA RALLY**

पुढील महिन्याच्या 8 तारखेला भारतीय हवाई दलाच्या 92 व्या वर्धापन दिनानिमित्त लडाखमधील थॉईसे ते अरुणाचल प्रदेशातील तवांगपर्यंत भव्य वायु वीर विजेता कार रॅलीचे आयोजन करण्यात

आले आहे. संरक्षण मंत्री राजनाथसिंह येत्या 1 ऑक्टोबरला  नवी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकापासून 7 हजार किलोमीटर अंतराच्या कार रॅलीला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. 29 ऑक्टोबरला तवांग इथं या रॅलीचा समारोप होईल. हवाई दलाचा गौरवशाली इतिहास, विविध युद्धे आणि बचाव कार्यांमधील हवाई योद्धांच्या शौर्याबद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे आणि तरुणांना लष्करी सेवेसाठी आकर्षित करणे हा या रॅलीचा उद्देश असल्याचं संरक्षण मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**CAIMAN CROCODILES**

कॅमन प्रजातीच्या मगरींच्या पाच पिल्लाची तस्करी करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोन जणांना मुंबईतल्या विमानतळावर अटक करण्यात आली. प्रवाशांच्या ट्रॉली बॅगमध्ये या मगरी लपवून ठेवण्यात आल्या होत्या. हा प्रवासी बँकॉकहून आला होता. या पाचही मगरींना त्यांच्या मूळ देशात परत पाठवण्यात आलं आहे.

**राष्ट्रीय तपास संस्था**

माओवाद्यांनी केलेल्या भारतीय लष्कराच्या जवानाच्या हत्येप्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेनं छत्तीसगडमधील उत्तर बस्तर जिल्ह्यातील अंबेडा भागात काल कारवाई केली.   या शोधमोहिमेत उसेली, गुमझीर, बडेटेवडा, उमरकुमटा आणि अंबेडा गावात NIA च्या  पथकानं  11 संशयितांच्या ठिकाणांची झडती घेतली.

या  कारवाईत एअर गन, हार्ड डिस्क, डीव्हीआर, मोटारसायकल,नक्षलवादी दस्तऐवज आणि 66 हजार 500 रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.

तसंच या तपासादरम्यान  गुन्हेगारी  कारवाईत सहभागी असलेल्या अनेक माओवादी समर्थकांची नावं देखील समोर आली आहेत.

**पीयूष गोयल**

केंद्र आणि उत्तर प्रदेशचं  सरकार 2047 पर्यंत देशाची अर्थव्यवस्था 35 ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचवण्यात  मोलाचं  योगदान  देत  आहे, असं मत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त  केलं. ते काल  ग्रेटर नोएडा इथं आयोजित उत्तर प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनाच्या  कार्यक्रमात  बोलत  होते.  पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनामुळे उत्तरप्रदेशची अर्थव्यवस्थादेखील एक  ट्रिलियन अमेरिकन डॉलरपर्यंत पोहोचण्यास मदत होईल असंही  गोयल म्हणाले. केंद्र सरकारनं राज्याच्या सहकार्यानं कायदे  सुलभ करणं आणि व्यवसाय सुलभतेला चालना देण्यास प्राधान्य दिलं आहे, असं  गोयल यांनी  सांगितलं.  मेक इन इंडियाच्या यशामुळे  भारताला

उत्पादन क्षेत्रात जागतिक स्तरावर एक शक्तिशाली राष्ट्र बनण्यास मदत होत  असून ज्यामुळे युवकांसाठी रोजगार आणि उद्योजक संधी निर्माण होतील,असंही  पीयूष गोयल यावेळी  म्हणाले.

**क्रिकेट**
कानपूर क्रिकेट कसोटीत काल दुसऱ्या दिवशी पावसामुळे खेळ होऊ शकला नाही. प्रथम फलंदाजी करताना बांग्लादेश संघाच्या 3 गडी बाद 107 धावा झाल्या आहेत.

दरम्यान बांग्लादेशविरुद्ध 3 सामन्यांच्या वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. सूर्यकुमार यादवकडे संघाचं नेतृत्व राहणार असून मयंक यादव आणि नीतीश कुमार रेड्डी यांची प्रथमच भारतीय संघात निवड करण्यात आली आहे.

**गुलवीरसिंग**
भारतीय खेळाडू गुलवीर सिंगनं  काल जपानमध्ये  सुरू  असलेल्या जागतिक ॲथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूरमध्ये पुरुषांच्या पाच  हजार मीटर शर्यतीत सुवर्णपदक जिंकलं.त्यानं 13 मिनिटे 11 पूर्णांक 82 सेकंद अशी वेळ नोंदवत एक नवा राष्ट्रीय विक्रम केला. त्याआधी हा विक्रम अविनाश साबळे याच्या नावावर होता.

**हवामान**
भारतीय हवामानशास्त्र विभागाने आज तामिळनाडू, कर्नाटक, लक्षद्वीप आणि केरळमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्याचबरोबर पुढील दोन दिवस गोवा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, उत्तरप्रदेश या राज्यातदेखील हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तर उत्तराखंड, हिमाचलप्रदेश, पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि दिल्ली येथे आगामी दोन दिवस हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं विभागाने म्हटलं आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.